ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# वर्गखोली बाहेरील शिक्षणाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**प्राचार्य डॉ. पांढरे विद्युलता**
उमा शिक्षणशास्त्र महाविदयालय, पंढरपूर

**प्रस्तावना**

शिक्षणाचे उद्दिष्टये मुलांच्या सर्वांगीण विकासाचे आहे. समग्र विकासामध्ये पाच महत्त्वपूर्ण घटक असतात. शारिरीक विकास, संज्ञानात्मक विकास, भावनिक विकास, सामाजिक विकास आणि सांस्कृतिक कलात्मक विकास ह्या घटकांचा विकास होतो. वर्ग अध्यापनातून सर्वच घटक विकसित होतील असे सांगता येणार नाही. तसेच वर्ग अध्यापन हे बंदिस्त असल्याने विद्यार्थी तितकेसे अध्ययनात रमत नाही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सतत प्रयत्न करत असताना काही अनुभव देत असताना वर्ग अध्यापन तितकेसे प्रभावी होत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष वातावरणाचा अनुभव देणेचं त्यांच्या विकासासाठी योग्य असते. प्रत्यक्ष अनुभवातून संकल्पना स्पष्ट होते. संकल्पनेचा सखोल अभ्यास केला जातो. संकल्पना दीर्घकाल स्मरणात राहण्यास मदत होते. त्यातूनच सृजनात्मक विकास होण्याची कल्पना रुजते. नवीनता शोधण्याचा सतत प्रयत्न केला जातो. तसेच वरील सर्व बाजूंचा विचार करता संशोधकाने प्रत्यक्ष वर्ग खोली बाहेरील शिक्षणांची परिणामकारकता अभ्यासण्याचे निश्चित केले. त्यासाठी सदर लघुसंशोधन करण्याचा प्रयत्न केला. कार्यानुभव हा विषय माध्यमिक अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. परंतु त्या विषयाकडे तितकेसे लक्ष दिले जात नाही. शिक्षक, विद्यार्थी, पालक हे विषयाकडे अगदी कमी गुणाचे किंवा गुणासाठी उपयुक्त नाही. ह्या दृष्टीने पाहतात. हे अत्यंत गंभीर बाब आहे. कार्यानुभव ह्या विषयातून नवनिर्मिती होण्यास मदत होते. तसेच विविध खुला विकसित होण्यास मदत होते. म्हणून संशोधकांने हा विषय सदर संशोधनासाठी निवडला आहे.

**वर्गखोली बाहेरील शिक्षणाचा अर्थ –**

''NEP 2020'' ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील 'बॅगलेस डे' म्हणून वर्गाच्या बाहेर शिक्षण. बॅगलेस दिवसांमध्ये कला, क्रीडा आणि व्यावसायिक हस्तकला यांचा समावेश असलेल्या विविध प्रकारचे संवर्धन उपक्रम होतील. असा प्रयत्न करणे यासाठी ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पर्यटकांच्या महत्त्वाच्या स्थळांना, स्मारकांना भेटी देऊन, स्थानिक कलाकार आणि कारगिरांना भेटी देऊन संप्रेषण, सहयोग, नवकल्पना, चौकशीची क्षमता, डिजीटल कौशल्ये इ. कौशल्यांच्या विकासासाठी वर्गाबाहेर शिक्षण फार आवश्यक आहे''.

**वर्गाच्या पलीकडे शिकण्याची वैशिष्ट्ये –**

1) शिकवणीचे अनुभव देण्यासाठी वर्गातून बाहेरच्या भागांचा उपयोग
2) पाठ्यपुस्तकांपलीकडील ज्ञान
3) करुन शिकणे आणि अखेरील उच्च ऑर्डर विचार करण्याचे कौशल्ये.
4) समुदायाशी प्रत्यक्ष संबंध
5) वास्तविक जीवनातल्या परिस्थितीशी सहभागी होण्यासाठी 21 व्या शतकातील कौशल्य विकसित.

**वर्गापलीकडील शिक्षणाचे फायदे**

1) शारिरीक विकास
2) सर्जनशीलतेचा विकास
3) व्यक्तिमत्त्व आणि भावनिक विकास
4) 21 व्या शतकातील विविध कौशल्यांचा विकास सामाजिक विकास
5) संशोधन वृत्तीचा विकास
6) सांस्कृतिक आणि सौंदर्याचा विकास
7) संज्ञात्मक विकास

**संशोधनाची गरज आणि महत्त्व –** वर्गखोली बाहेरील शिक्षणाची संकल्पना जाणून घेणे. आधुनिक अध्ययनाची शास्त्र शुध्द पध दती विकसित करणे.

वर्गखोली बाहेरील शिक्षणाची परिणामकारकता जाणून घेणे. नवीन संकल्पनाचा प्रत्यक्ष वापर करण्यासंबंधी माहिती विकसित करणे.

**संशोधन शीर्षक –**

वर्गखोलीबाहेरील शिक्षणाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

**संशोधनाची उद्दिष्टये –**

1) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना कार्यानुभव विषयातून अ

यापनाव्दारे मातीकाम कौशल्य विकसनाच्या परिणाम कारकतेचा अभ्यास करणे.

2) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना कार्यानुभव विषयातून वर्गाबाहेरील मातीकाम कौशल्य विकसनाच्या परिणाम कारकतेचा अभ्यास करणे.

3) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्यामध्ये कार्यानुभव विषयातून वर्गामधील मातीकाम कौशल्य विकसन अध्यापन आणि वर्गाबाहेरील मातीकाम कौशल्य विकसन अध्यापनाच्या परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**शुन्य परिकल्पना –**

इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांमध्ये कार्यानुभव विषयातून मातीकाम विकसनासाठी वर्ग अध्यापन आणि वर्गाबाहेरील अध्यापनाव्दारे परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

**संशोधन व्याप्ती –**

सदर संशोधनासाठी सोलापूर शहरातील माध्यमिक शाळेतील सहेतुक इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या 20 विद्यार्थ्यांचा समावेश संशोधनासाठी केला आहे.

**संशोधन मर्यादा –**

1) प्रस्तुत संशोधन हे सोलापूर शहरातील माध्यमिक शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या पुरतेच मर्यादित आहे.

2) प्रस्तुत संशोधन हे कार्यानुभव विषयातील मातीकाम विकसनापुरतेच मर्यादित आहे.

**संशोधन पध्दती व न्यादर्श –**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

**न्यादर्श –**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांचा समावेश केलेला आहे. इयत्ता सहावीच्या वर्गासाठी कार्यानुभव विषयाचा समावेश केला आहे. कार्यानुभव विषयाच्या अध यापनासाठी 20 विद्यार्थ्यांच्या गटाची निवड केली आहे.

**संशोधन कार्य पध्दती –**

कार्यानुभव विषय हा शिकविताना संशोधकाने प्रथम 20 विद्यार्थ्यांचा गट तयार केला. प्रथम ह्या गटासाठी पारंपारिकता पध्दतीने वर्गात कार्यानुभव विषयाचा तासामध्ये मातीकाम विषयी अध यापन आणि दिदर्शन पाठ घेण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना कृती देऊन निरीक्षण सूचीच्या आधारे मार्क देण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कुंभाराच्या मातीकाम करण्याच्या ठिकाणास भेट देऊन निरीक्षण, चर्चा, दिग्दर्शन कृती ह्या व्दारे प्रत्यक्ष कुंभाराचे मार्गदर्शन देण्यात आले. त्यानंतर पुन्हा विद्यार्थ्यांना कृती देण्यात आली. त्याचे निरीक्षण करुन गुणदान देण्यात आले. पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी ह्यामध्ये तुलना करण्यात आली. त्यावरुन 'ज' मूल्य काढले आणि गुणांच्या फरकांचा विचार प्रस्तुत संशोधनात केला आहे.

**मूल्यपरिक्षण**

| | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | नमुना DF3 आणि मुल्य सार्थकता 0.05 0.01 | प्राप्त |
|---|---|---|---|---|---|
| पुर्व चाचणी | M1 = | 10.30 | 61=2.37 | | |
| | | 0.9028 | 0.0242 | 2.71 3.4891 | |
| उत्तर चाचणी | M2= | 13.450 | 62=3.37 | | |

**निष्कर्ष** – संशोधकाचे 't' मूल्य 3.4891 हे कोष्टकातील मुल्यापेक्षा खुपच जास्त आहे. 0.05, 0.01 या सार्थकता स्तरापेक्षा प्राप्त 't' मूल्य खूपच मोठे असल्यामुळे पडणारा फरक हा सार्थ वास्तव व लक्षणीय आहे. त्यामुळे शुन्य परिकल्पनेचा त्याग केला आहे. यावरुन अध्यापन करताना काही घटकांचे अध्यापन करताना 'वर्गखोली बाहेर' शिक्षण हे अत्यंत परिणामकारक आहे.

***संदर्भ ग्रंथ सुची –***


1) *मुळे रा. शं. आणि उमाठे वि.तु. (1987) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर महाराष्ट्र साहित्य निर्मिती मंडळ*

2) *पंडित ब. वि. (2005), शिक्षणातील संशोधन, पुणे, नुतन प्रकाशन.*

3) *वेब संदर्भ ग्रंथ सुची – www-google-com*